

# शालेय शिक्षण विभाग

## अर्थसंकल्प : २०२५-२६

### महाराष्ट्र शासन

**समर्थन**

**अर्थसंकल्प अध्ययन केंद्र**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☏ ०२२-२२००३०६०
Email: samarthanmumbai97@gmail.com/samarthanmumbai1997@gmail.com/ : www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **ॲड.(डॉ.) अशोक येंडे**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

**सचिव : डॉ. आशिष भोसले**

संपादन :
**मुक्ता भारती /हिंदप्रभा कर्वे**

**विश्लेषण आणि संकलन:**
**रुपेश कीर -९८९२९३९६१७**
**स्नेहा घरत-८४८५८९४४६३**

विशेष सहाय्य :
**विलास सुवरे,राजश्री कदम**
**निलम काकड,व उमेश सांगळे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
**समर्थन -** १०५, लोटस हाऊस,
लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटलजवळ,
सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मरिन लाईन्स (पू),
मुंबई -४०० ०२० ☎ ०२२-२२००३०६०
Email:samarthanmumbai97@gmail.com,
samarthanmumbai1997@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org

## लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे ‘समर्थन’

### समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे ‘समर्थन’. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### ‘समर्थन’च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# टिपण वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- ‘समर्थन’ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती टिपणाचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. हे टिपण माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २०१७-१८ पासून २०२३-२४ पर्यंत प्रत्यक्ष खर्च आणि २०२४-२५ सुधारित अंदाज तसेच २०२५-२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज समाविष्ट केले आहेत.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्य
- प्रमुख सामाजिक सेवांचे विभागवार टिपण टप्प्या-टप्प्याने प्रसिद्ध करण्यात येईल.

**विश्लेषण आणि संकलन:**
**रुपेश कीर -९८९२९३९६१७**

**मार्गदर्शक-विवेक पंडित**
संस्थापक, समर्थन

# शालेय शिक्षणाची ठळक वैशिष्ट्ये

## राज्यातील प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळांचे वास्तव

### प्राथमिक शाळांची स्थिती:

- एकूण १ लाख ४ हजार ४९९ प्राथमिक शाळांपैकी १० हजार ३९७ (९.९५ टक्के) शाळांमध्ये अद्याप पिण्याच्या पाण्याची सोय नाही.
- ११ हजार १८१ (१०.७ टक्के) शाळांना संरक्षक भिंत नाही.
- ४ हजार ३८८ (४.२ टक्के) प्राथमिक शाळांना मुलींकरिता कार्यरत शौचालय सुविधा नाही.
- २९ हजार ५० (२७.८ टक्के) प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांना संगणक व्यवस्था पोहोचली नाही.
- ६ हजार १६५ (५.९ टक्के) शाळांना दिव्यांगांसाठी उतरत्या रस्त्यांची सुविधा नाही.
- १३ हजार ५८४ (१३ टक्के) शाळांना खेळाचे मैदानच नाही.
- ७ हजार ४१९ (७.१० टक्के) शाळांना ग्रांथालये नाहीत.
- ५ हजार ८५१ (५.६ टक्के) शाळांना विद्युत जोडणी नाही.

### माध्यमिक व उच्च शाळांची स्थिती:

- २८ हजार ९८६ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळा आहेत.
- १ हजार ३९१ (४.८ टक्के) माध्यमिक शाळांना संरक्षक भिंत नाही.
- १ हजार ३९१ (४.८ टक्के) शाळांना खेळाचे मैदान नाही.
- १ हजार ४३ (३.६ टक्के) शाळांना ग्रंथालये नाहीत.
- १ हजार ४७८ (५.६ टक्के) शाळांना संगणक नाहीत.
- ३७७ (१.३ टक्के) शाळांना मुलींकरीता शौचालयाची सुविधा नाही.

- २ हजार ५५० (८.८ टक्के) शाळांना दिव्यांगांसाठी उतरंड नाही.
- AI सारखे तंत्रज्ञान जगात विकसित होत असताना शासनाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक मिळून ४ हजार ८११ (१६.८ टक्के) शाळांमध्ये संगणक व इंटरनेटची प्राथमिक सुविधाही उपलब्ध नाही.
- १ हजार ४७८ (५.१ टक्के) शाळांमध्ये संगणकाची सुविधा उपलब्ध नाही.
- माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील ६३ लाख ७० हजार पटसंख्या होती त्यापैकी ५ लाख ३५ हजार ८० (८.४० टक्के) एवढी मुले शाळाबाह्य झालीत.

**एकूण शाळांपैकी मराठी शाळांचे प्रमाण**

- सन २०२३-२४ राज्य मंडळाच्या १३ हजार २८२, सी. बी. एस. ई. च्या १ हजार १७८, राज्य मंडळ व सी.बी.एस.ई. च्या १६, आय.सी.एस.ई. / आय.जी.सी.ए.ई. किंवा आय.बी. व इतर मिळून ३७५ अशा एकूण १४ हजार ८५१ स्व-अर्थ सहाय्यता शाळा असून त्यापैकी मराठी माध्यमाच्या शाळा केवळ १ हजार ९५४ (१३.१५ टक्के) शाळा आहेत.

**रिक्त पदे**

- शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या गट अ ते गट ड श्रेणीतील एकूण ८ हजार ११३ मंजूर पदांपैकी ३ हजार ६३३ (४४.७८ टक्के) पदे भरली आहेत तर ४ हजार ४८० (५५.२२%) पदे रिक्त आहेत.
- ३ हजार ६३३ पदांपैकी पुरुष कर्मचारी संख्या २ हजार ७१७ (७४.७९ टक्के) इतकी असून स्त्री कर्मचाऱ्यांची संख्या केवळ ९१६ (२५.२१ टक्के) इतकी आहे.
- भरलेल्या एकूण पदांपैकी ११५ दिव्यांग कर्मचारी आहेत.


*(**स्त्रोत:** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२४-२५, यूडायस+ अहवाल, २०२३-२४)*

# शालेय शिक्षण विभाग

सामाजिक आणि आर्थिक विकासाची प्रगती सुकर करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व सर्वमान्य आहे. शिक्षणामुळे वैयक्तिक आणि सामूहिक नावलौकिक मिळविण्याच्या संधी उपलब्ध होतात. लोकांना कौशल्य व ज्ञान मिळवून देऊन त्यांना उत्पादक रोजगारीची संधी मिळवून देणे आणि पर्यायाने राज्याच्या आर्थिक विकासाला गतिमान करण्यासाठी तसेच युवकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शिक्षण हे एक अत्यंत निर्णायक साधन आहे. शिक्षणाद्वारे व्यक्तीचे केवळ लेखन व वाचन संस्था विकसित करणे एवढेच अपेक्षित नसून व्यक्तीमधील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यांचा विकास करून, परिपूर्ण व्यक्तिमत्त्व घडविणे हे शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्याला यापुढे भौतिक पायाभूत सुविधांसोबत सामाजिक पायाभूत सुविधा (Social Infrastructure) निर्माण करण्यावर भर द्यावा लागणार आहे. महाराष्ट्रात भौतिक पायाभूत सुविधांसाठी ज्या गतीने निधी उपलब्ध होतो. तशीच गती शिक्षणाचा समावेश असणाऱ्या सामाजिक पायाभूत सुविधांवर करणे क्रमपात्र ठरते.

## मागील ७ वर्षांत शालेय शिक्षण विभागाच्या एकूण अर्थसंकल्पात सरासरी खर्च केवळ रु. ५७ हजार कोटी!

*आलेख क्र. १.* *(रु.कोटीत)*




| | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ४८८४४ | ५१५६५ | ६०६०६ | ६१३१६ | ६२८१७ | ६६८८६ | ७३६६६ | ८१३३५ | ८६२२० |
| सुधारित अंदाज | ४६१८२ | ४८४७८ | ५७९४४ | ५५५९० | ६०१४६ | ६९३०८ | ८०७६५ | ७८५८७ | |
| प्रत्यक्ष खर्च | ४१९३६ | ४४३८० | ५४८१० | ५३७८६ | ५८८१२ | ६८४३७ | ७७४२७ | | |


*(**स्त्रोत** : वित्तविषयक विवरणपत्र व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा) टीप: वर्ष २०२४-२५ चे सुधारित अंदाज व वर्ष २०२५-२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **सन २०२७-१८ ते सन २०२३-२४ या मागील ७ वर्षांत शालेय शिक्षण विभागाचा सरासरी खर्च हा ५७ हजार ८४ कोटी रुपये इतका झाला.**

✍ त्यामुळे सन २०२५-२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज व वर्ष २०२४-२५ मधील सुधारित अंदाज हे मोठ्या स्वरूपात मांडले जाऊनही विभागाला मात्र त्यामानाने कमीच निधीची उपलब्धता होईल.

## गेल्या ७ वर्षात शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चात प्राथमिक शिक्षणावर झालेला खर्च ५४.१८ टक्के आहे !

*आलेख क्र. २*




*(स्त्रोत: खर्चाचा प्रधानशीर्ष नि विभागवार सारांश व लोकलेखा, अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका, निव्वळ रकमा)*
*टीप: वर्ष २०२४-२५ चे सुधारित अंदाज व वर्ष २०२५-२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*


✍ सन २०२३-२४ मध्ये शिक्षण विभागातील एकूण खर्चापैकी सर्वाधिक रक्कम ५६.१० % प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्यात आली. मात्र सन २०२४-२५ च्या सुधारित खर्चाशी तुलना करता त्यात ०.२ % घट होऊन हा खर्च ५५. ९० % वर आला आहे.

✍ सन २०१७-१८ ते सन २०२३-२४ या ७ वर्षात शिक्षणावर होणाऱ्या एकूण खर्चात प्राथमिक शिक्षणावर होणारा सरासरी खर्च केवळ ५४.१८ % राहिला आहे.

✍ गेल्या ७ वर्षात प्राथमिक शिक्षणासाठी सर्वात कमी निधी सन २०२१-२२ मध्ये ५३.०२% उपलब्ध झाला तर सन २०२३-२४ मध्ये सगळ्यात जास्त ५६.१० % निधी खर्च झाला.

# राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत
# सर्वसाधारण शिक्षणावर झालेला सरासरी खर्च १५.१२ टक्के !

*आलेख क्र. ३*




| | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | २०२५-२६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | १६.०१ | १४.५९ | १५.६० | १४.८२ | १४.९३ | १४.६६ | १५.२६ | १२.१५ | १२.९१ |

*(**स्रोत** : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*


*टीप: वर्ष २०२४-२५ चे सुधारित अंदाज व वर्ष २०२५-२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **राज्य अर्थसंकल्पा पैकी सर्व साधारण शिक्षणावर मागील ७ वर्षात सरासरी १५.१२% निधी उपलब्ध झाला.**
- **सर्व साधारण होणाऱ्या खर्चाचा आलेख पाहता असे दिसते की, शासनाने सन २०१७-१८ मध्ये सर्वात जास्त १६.०१ % इतका खर्च केला होता तर सन २०२२-२३ मध्ये तो खर्च सर्वात कमी १४.६६ % इतका होता.**
- **सन २०२४-२५ चे सुधारित अंदाज पाहता, राज्य अर्थसंकल्पा पैकी सर्वसाधारण शिक्षणावर होणारा खर्च १२.१५ टक्के इतका कमी होणार असे दिसत असून तो आत्तापर्यंतचा सर्वात मोठा निचांक असेल.**

# सर्वसाधारण शिक्षण व तंत्रशिक्षणावरील खर्च

## राज्य स्थूल उत्पन्नाच्या केवळ २.१८ टक्के!

*आलेख क्र. ४*




*(स्रोत : संक्षिप्त अर्थसंकल्प, व खर्चाचा प्रधान शीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा, निव्वळ रकमा)*
*(टीप: शिक्षणावरील एकूण खर्चात २२०२, सर्वसाधारण शिक्षण व २२०३, तंत्र शिक्षण यांचा समावेश आहे)*
*(टीप: वर्ष वर्ष २०२४-२५ चे सुधारित अंदाज व वर्ष २०२५-२६ चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **शिक्षणावरील खर्च (२२०२), सर्व साधारण शिक्षण व (२२०३) तंत्र शिक्षण या शीर्षांच्या च्या अंतर्गत होतो. या दोन्ही शीर्षांवर होणाऱ्या खर्चाचे राज्य स्थूल उत्पन्नाशी असलेले प्रमाण सन २०१७-१८ ते २०२३-२४ पर्यंत सरासरी २.१८ टक्के इतके होते.**
- **सन २०१९-२० मध्ये सर्व साधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण २.६० % इतके होते मात्र त्यानंतर त्यामध्ये सातत्याने घट होत गेली आहे.**
- **सन २०१८-१९ मध्ये सर्व साधारण शिक्षण व तंत्र शिक्षणावर खर्चाचे प्रमाण १.९१ % इतके कमी होते.**

# शासनाला मागील ४ वर्षात ३८ हजार ४५९ मुले शाळाबाह्य आढळून आलेत

तक्ता क्र.१

| विद्यार्थी | २०२१ | २०२२ | २०२३ | २०२४ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| शाळा बाह्य विद्यार्थी | २३६९३ | ९१९४ | ३१८८ | २३८४ | ३८४५९ |
| शाळेत दाखल केलेले विद्यार्थी | २३३५३ | ९१२८ | १६६२ | २३१८ | ३६४६१ |
| शाळेत दाखल न झालेले विर्द्यार्थी | ३४० | ६६ | १५२६ | ६६ | १९९८ |

*(स्त्रोत: प्राथमिक शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, फेब्रुवारी २०२५: माहिती अधिकारा अंतर्गत प्राप्त माहिती)*

- **सन २०२१ ते २०२४ या चार वर्षात शासनाला एकूण ३८ हजार ४५९ मुलं शाळाबाह्य आढळून आले, त्यापैकी ३६ हजार ४६१ मुलांना शाळांमध्ये दाखल करण्यात आले. तर १ हजार ९९८ मुल शाळेत दाखल झाले नव्हते.**
- **सन २०२१ मध्ये सर्वाधिक २३ हजार ६९३ विद्यार्थी हे शाळाबाह्य आढळून आलेत, त्यापैकी २३ हजार ३५३ मुलांना शाळेत दाखल करण्यात आले तर ३४० विध्यार्थी शाळेत दाखल झाले नव्हते.**
- **सन २०२३ मध्ये ३ हजार १८८ शाळा बाह्य विद्यार्थ्यांपैकी केवळ १ हजार ६६२ विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत दाखल करण्यात यश आले, तर १ हजार ५२६ विद्यार्थी शाळाबाह्यच राहिले असून मागील ४ वर्षात शाळाबाह्य राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वात जास्त होते.**

## सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये शाळांची संख्या १ हजार ७०५ ने घटली!

### तर सर्व शाळांमधील पट संख्या १८ लाख ५५ हजार ७२३ (७.९९ टक्के) ने घटली!

### तर सर्व शाळांमधील शिक्षक संख्या ३२ हजार (४.१६ टक्के) ने कमी झाली!

**सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये मराष्ट्रातील शाळांमधील विद्यार्थी व शिक्षकांचे तुलनात्मक विश्लेषण (इयत्ता १ ली ते १२ वी):**

**तक्ता क्र.२**

| वर्ष | एकूण शाळा | पट संख्या | शिक्षक संख्या | विद्यार्थी शिक्षक प्रमाण (PTR) | एकशिक्षकी शाळा |
|---|---|---|---|---|---|
| २०१८१९- | १०९९४२ | २३२३१६९३ | ७७०१२५ | २८ | ३७९६ |
| २०२३२४- | १०८२३७ | २१३७५९७० | ७३८११४ | २९ | ८१९६ |
| घट(+)वाढ/(-) | १७०५- | १८५५७२३- | ३२०११- | १+ | ४४००+ |

*(**स्त्रोत:** यूडायस+ अहवाल, २०२३-२४)*

- **सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये शाळांची संख्या १ हजार ७०५ (१.५८ टक्के) ने घटली.**
- **सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये सर्व शाळांमधील पटसंख्या १८ लाख ५५ हजार ७२३ (७.९९ टक्के) ने घटली आहे.**
- **सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये सर्व शाळांमधील शिक्षक संख्या ३२ हजार ११ (४.१६ टक्के) ने कमी झाली आहे.**
- **सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये सर्व शाळांमधील एकशिक्षकी शाळांची संख्या ४ हजार ४०० (११५.९१ टक्के) ने वाढून ती ८ हजार १९६ इतकी झाली आहे.**
- **सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये सर्व शाळांमधील विद्यार्थी शिक्षक प्रमाण (Pupil Teacher Ratio) जे २८ होते त्यात १ ने वाढ होऊन २९ इतके झाले आहे.**

# सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये
## अनुदानित शाळांमध्ये ६१९ ने वाढ !

### सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये शासकीय, अनुदानित, खाजगी व इतर शाळांची संख्या:

**तक्ता क्र.३**

| वर्ष | एकूण | शासकीय | अनुदानित | खाजगी | इतर |
|---|---|---|---|---|---|
| २०१८ १९- | १०९९४२ | ६६०३३ | २३५५४ | १९४०० | ९५५ |
| २०२३ २४- | १०८२३७ | ६५१५७ | २४१७३ | १८६४२ | २६५ |
| घट (+)वाढ/(-) | १७०५- | ८७६- | ६१९+ | ७५८- | ६९०- |

*(**स्त्रोत:** यूडायस+ अहवाल, २०२३-२४)*

- **सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये शाळांची संख्या १ हजार ७०५ (१.५५ टक्के) ने घटली असून सर्वात जास्त शासकीय शाळांमधील ८७६ (१.३३ टक्के), खाजगी शाळांमधील ७५८ (३.९१ टक्के) तर इतर शाळांमधील ६९० (७२.२५ टक्के), शाळा कमी झाल्या आहेत, तर ६१९ (२.६३ टक्के) अनुदानित शाळांमध्ये वाढ झाली आहे.**

# खाजगी शाळांतील शिक्षक संख्या २५ हजार १२ ने वाढली!

### सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये सर्व प्रकारच्या शाळांमधील शिक्षकांची संख्या:

**तक्ता क्र.४**

| वर्ष | एकूण शिक्षक | शासकीय शिक्षक | अनुदानित शाळांमधील शिक्षक | खाजगी शाळांतील शिक्षक | इतर शाळांतील शिक्षक |
|---|---|---|---|---|---|
| २०१८ १९- | ७७०१२५ | २५७९३९ | २९८८६० | २०७३५६ | ५९७० |
| २०२३ २४- | ७३८११४ | २२८४९१ | २७५४७५ | २३२३६८ | १७८० |
| घट (+)वाढ/(-) | -३२०११ | -२९४४८ | -२३३८५ | +२५०१२ | ४१९०- |

*(**स्त्रोत:** यूडायस+ अहवाल, २०२३-२४)*

- **सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये शासकीय, अनुदानित व इतर शाळांमधील शिक्षकांची एकूण संख्या ५७ हजार २३ (१२.१० टक्के) ने घटली आहे तर त्याच कालावधीत खाजगी शाळांतील शिक्षक संख्या २५ हजार १२ (१२.०६ टक्के) ने वाढली आहे.**
- **त्यामुळे शिक्षकांची सर्व शाळांच्या तुलनेत झालेली एकूण घट ३२ हजार ११ (४.१६ टक्के) इतकी आहे.**

# सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये विविध कारणांमुळे विद्यार्थी संख्या १८ लाख ५५ हजार ७२३ने घटली!

सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये विद्यार्थी संख्या घटण्याची कारणे विविध असू शकतात मात्र या कालावधीत अनधिकृत शाळांचे पेव फुटल्यामूळे तसेच अनेक शाळा सर्वांना मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिनिय, २००९ च्या नियमानुसार अनेक शाळा अनाधिकृत ठरल्यामुळे आशा शाळांमधून शिकणारे विद्यार्थी संख्या यामधून वगळले गेलेले असू शकतात; त्यामुळे विद्यार्थी संख्या कमी झाली असल्याचे दिसू शकते.

## सन २०१८-१९ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये विद्यार्थ्यांची स्थिती:

तक्ता क्र.५

| वर्ष | एकूण | शासकीय | अनुदानित | खाजगी | इतर |
|---|---|---|---|---|---|
| २०१८ १९- | २३२३१६९३ | ५७७१९०८ | १०८३९३८५ | ६४५३९३४ | १६६४६६ |
| २०२३ २४- | २१३७५९७० | ५३२५५७१ | ९७७२६०८ | ६२३६६१० | ४११८१ |
| घट(+)वाढ/(-) | -१८५५७२३ | -४४६३३७ | -१०६६७७७ | -२१७३२४ | -१२५२८५ |

*(**स्त्रोत:** यूडायस+ अहवाल, २०२३-२४)*

- सन १८-१९ मध्ये एकूण शाळांमधून २ कोटी ३२ लाख ३१ हजार ६९३ विद्यार्थी शिकत होते, त्या तुलनेत सन २०२३-२४ मध्ये विद्यार्थ्यांची संख्या २ कोटी १३ लाख ७५ हजार ९७० इतकी झाली असून विविध कारणांमुळे विद्यार्थी संख्या १८ लाख ५५ हजार ७२३ (७.९९ टक्के) ने घटली आहे.
- एकूण घट झालेल्या १८ लाख ५५ हजार ७२३ विद्यार्थ्यांपैकी सर्वात जास्त अनुदानित शाळांतील १० लाख ६६ हजार ७७७ ( ५७.४८ टक्के) विद्यार्थ्यांची संख्या घटली असून शासकीय शाळातील विद्यार्थी संख्या ४ लाख ४६ हजार ३३७ (२४.०५ टक्के) इतकी असून खाजगी शाळेतील विद्यार्थी संख्या २ लाख १७ हजार ३२४ (११.७१ टक्के ) ने घटली तर इतर शाळांमधील विद्यार्थी संख्या १ लाख २५ हजार २८५ (६.७५ टक्के) ने घटली आहे .

# २०२३-२४ मध्ये इयत्ता ६ वी ते १० वी दरम्यान
# ३ लाख ९७ हजार २०८ विद्यार्थ्यांची गळती!

## सन २०२३-२४ मध्ये इयत्ता १ ली ते १० वी च्या सर्व शाळांमधील विद्यार्थी गळती:

**तक्ता क्र.६**

| सन २०२३-२४ मध्ये इयत्ता १ ली ते १० वी दरम्यान विद्यार्थी गळती | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | प्राथमिक (इयत्ता- १-५) | | | उच्च प्राथमिक (इयत्ता-६-८) | | | माध्यमिक (इयत्ता ९-१०) | | | एकूण | | |
| २०२३ २४- | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| | ० | ० | ० | २०४९९ | १३००८ | ३३५०७ | २११९३६ | १५१७६५ | ३६३७०१ | २३२४३५ | १६४७७३ | ३९७२०८ |

*(**स्त्रोत:** यूडायस+ अहवाल, २०२३-२४)*

- **सन २०२३-२४ मध्ये उच्च प्राथमिक म्हणजे इयत्ता ६ वी ते ८ वी मध्ये ३३ हजार ५०७ इतक्या विद्यार्थ्यांची गळती झाली असून त्यापैकी २० हजार ४९९ (६१.१७ टक्के) मुलांची तर १३ हजार ८ (३८.८२ टक्के) इतक्या मुलींची शाळांतून गळती झाली आहे.**
- **सदर कालावधीत माध्यमिक गटात म्हणजे इयत्ता ९ वी ते १० वी मध्ये एकूण ३ लाख ६३ हजार ७०१ विद्यार्थ्यांची शाळांतून गळती झाली असून त्यापैकी २ लाख ११ हजार ९३६ (५८.२७ टक्के) मुलांची तर १ लाख ५१ हजार ७६५ (४१.७२ टक्के) मुलींची गळती झाली आहे.**
- **सदर कालावधीत इयत्ता १ ली ते ५ वी मध्ये एकही मुलाची गळती झाली नसली, तरी इयत्ता ६ वी ते १० वी मध्ये ३ लाख ९७ हजार २०८ विद्यार्थ्यांची गळती झाली असून २ लाख ३२ हजार ४३५ (५८.५१ टक्के) इतकी मुलांची संख्या असून १ लाख ६४ हजार ७७३ (४१.४९ टक्के) मुली होत्या.**

# दिव्यांगांसाठी स्वतंत्र विभाग स्थापन;

## परंतु दिव्यांग विद्यार्थ्यांवरील खर्चात सन २०२३-२४ च्या तुलनेत सन २०२४-२५ मध्ये ४६ कोटी ८४ लाख रुपयाने घट!

तक्ता क्र.७ *( रु. कोटीत )*

| इयत्ता | २०२३-२४ | | २०२४-२५ (+नोव्हेंबर पर्यंत) | | २०२३-२४ व २०२४-२५ वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाखात) | खर्च (कोटीत) | लाभार्थी (लाखात) | खर्च (कोटीत) | लाभार्थी (लाखात) | खर्च (कोटीत) |
| १ली ते ८वी | १.९० | ३२.६७ | १.७६ | ०.१३ | -०.१४ | -३२.५४ |
| ९वी ते १२वी | ०.५१ | १४.४१ | ०.५५ | ०.११ | +०.०४ | -१४.३ |
| **एकूण** | **२.४१** | **४७.०८** | **२.३१** | **०.२४** | **०.१०** | **-४६.८४** |

*(**स्त्रोत:** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०२४-२५)*

- **इयत्ता १ ली ते ८ वीच्या दिव्यांग विद्यार्थ्यांचा विचार करता सन २०२३-२४ च्या तुलनेत वर्ष २०२४-२५ मध्ये १४ हजार विद्यार्थी घटले असून खर्चात ३२ कोटी ५४ लाख रुपयांची घट झाली आहे.**
- **माध्यमिक स्तरावर (इयत्ता ९ वी ते १२वी) ४ हजार विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली असली तरी १४ कोटी ३० लाख रुपयांची खर्चात घट झाल्याचे दिसते.**